FORM-1 A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे भ्रा. प्र. वि. मुंबई पहिली खबर क्र. 08/22, वर्ष 2023, दिनांक 25/09/2023
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. 1988 कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार ..., तारीख पासून 19/09/2023 वेळ ... ते 25/09/2023 पर्यंत 14:42 ... तारीख पर्यंत ..., वेळ
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 ~~(5) 12.00 ते 15.00~~
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 25/09/2023, वेळ 10:00
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 85/23, तारीख 25/09/23, वेळ 23:50 वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पूर्वेला 7 कि.मी. चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव 1 ला मजला, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव ...
Address of Occurrence Name धर्मादाय आयुक्त भवन, सासमीरा इमारत, डॉ. ॲनी बेझंट रोड, Ward No. ... Name of Road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण वरळी, गाव मुंबई, पोस्ट 400030, तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name विशाल रविंद्र मिश्रा (b) वडीलाचे / पतीचे नाव रविंद्र मिश्रा
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 38 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9892843025
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ... दिल्याचा दिनांक ... दिल्याचे ठिकाण ... (f) व्यवसाय ...
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु, जात Caste ब्राम्हण, जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता : ... गल्ली / सर्वे नं. ... घर / नाव नंबर ... फोन / मो. नंबर ... पॅन नं. ... वोटर्स नं.
Address बी / 1, द्वारिका विजय, Ward ... House No. ... सभाष रोड, Phone/M. No. ... हिंदुस्थान ... PAN No. ..., चारकोप
रस्त्याचे नाव कांदिवली (पश्चिम) जवळचे ओळखीचे ठिकाण ... मुंबई - 67 ... पोस्ट ... पो. स्टे. ...
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ... जिल्हा ... राज्य ... सध्याचा पत्ता ...
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on.form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

गणेश शिवाजी बोबले वय-51 वर्षे, धंदा नोकरी (लेखापाल, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धर्मादाय आयुक्त भवन सासमीरा इमारत वरळी) मु. 20
रा. टी. 6/48/4 शासकीय वसाहत, खेरवाडी, बांद्रा पूर्व, मुंबई - 51.

क

यातील फिर्यादी नामे श्री. कृष्णा रविंद्र मिश्रा यांचा स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखीत केलेला जबाब हा गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(इम्रान म. इनामदार)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

फिर्याद

लाप्र.वि कार्यालय मुंबई
दि– २५/०१/२०२३

श्री. कृष्णा रविंद्र मिश्रा, वय ३८ वर्षे, व्यवसाय– प्रॉपर्टी एजंट , रा.ठी. बी/४, दिग्विजय नगर, एम. जी. रोड, हिंदुस्थान नाका, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई–६७, मो.क्र. ९८९२३४३७३८, आधार कार्ड नं.३७९६ ५९२५ ७१२८, पॅन नं. ASXPM3387P

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझी पत्नी सौ. निलीमा मिश्रा, मुलगी कु. गीत व मुलगा आरंभ यांचेसह राहतो. मी जागा खरेदी विक्रीचा व्यवसाय करत असून त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर आमचा उदरनिर्वाह चालतो. तसेच मी RPI (A) पक्षाचा पदाधिकारी असून समाजसेवेचे काम करतो.

माझी मुलगी कु. गीत मिश्रा ही पोंयसर जिमखाना, कांदिवली (प) येथे कराटेचे प्रशिक्षण घेत असुन महाराष्ट्र कराटे असोसिएशन तर्फे वेळोवेळी घेतल्या जाणा–या कराटे स्पर्धांमध्ये भाग घेत असते. याच अनुषंगाने मी महाराष्ट्र कराटे असोसिएशन संबंधीत माहिती प्राप्त करण्याकरीता दि. ०४/११/२२ रोजी माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, पत्ता–धर्मादिय आयुक्त भवन, सास्मीरा इमारत, डॉ. अॅनी बेझट मार्ग, वरळी, मुंबई ३० या पत्त्यावर स्पीड पोस्टव्दारे माहिती अधिकार अंतर्गत अर्ज पाठविले होते. परंतु मला याबाबत वेळेत प्रतिसाद न मिळाल्याने मी दि २०/१२/२२ रोजी पासुन वेळोवेळी या कार्यालयात जात असुन पुर्ण माहिती देण्यात आली नाही. यावरून मी सदर कामाशी संबंधीत जन माहिती अधिकारी (न्याय) तथा अधीक्षक (न्याय शाखा), सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, मुंबई यांचे लिपीक श्री आशिष फाजगे यांची भेट घेतली असता त्यांनी मला माहिती अधिकारांतर्गत माहिती पाहिजे असेल तर चहा–पाण्याकरीता ५,०००/– रू खर्च करावे लागतील असे सांगितले.

मी त्यांना सदर रक्कम ही माहिती देण्याकरीता शासकीय फी आहे किंवा कसे अशी विचारणा केली असता त्यांनी नाही असे सांगून, पैसे दिले तरच माहिती मिळेल असे सांगितले व कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील कॅश काउंटरवर लेखापाल इंस्पेक्टर श्री गणेश बोंबले यांना भेटून ५,०००/–रू देण्यास सांगितले.

यानंतर मी दि.१९/०१/२३ रोजी मी मागितलेल्या माहिती पैकी काही माहिती मला अर्जंट हवी असल्याने लेखापाल इंस्पेक्टर श्री गणेश बोंबले यांना भेटलो असता त्यांनी माझ्याकडून माझे इच्छेविरूध्द १०००/–रू घेवून काही कागदपत्रे दिली व संपुर्ण माहिती हवी असल्यास उर्वरीत ४,०००/– रू लाच दयावी लागेल तरच पूर्ण माहिती मिळेल असे सांगून संपूर्ण माहिती देण्यास नकार दिला व आज रोजी ४,०००/– रू लाच घेवून येण्यास सांगितले.

परंतु मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे कार्यालयात येऊन १) लिपीक श्री. आशिष फाजगे व २) श्री.गणेश बोंबले, लेखापाल इन्सपेक्टर या दोघांविरूध्द दि.२५/०१/२०२३ रोजी सकाळी समक्ष येवून कायदेशीर तक्रार असल्याचे सांगितले असता त्यावेळी पो.नि. इम्रान इनामदार यांना बोलावून मला त्यांचेकडे तक्रार देण्याबाबत सांगितले. त्यानंतर पो.नि. इनामदार यांनी पोलीस पथकातील सपोआ गोधे, दोन सरकारी पंच सचिन शिर्सेकर, अनिकेत बनकर यांच्याशी माझेशी ओळख करून दिली. मला मराठी भाषा बोलता व वाचता येते परंतु व्यवस्थित लिहीता येत नाही यामुळे माझे सांगणेप्रमाणे पो.नि इनामदार यांनी लॅपटॉपवर मराठीत तक्रार टाईप केली व त्यांची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पहिली असता ती बरोबर होती. त्या अर्जावर पो.नि. इनामदार व पंचानी सहया केल्या.

त्यानंतर पो.नि. इनामदार यांनी मला सापळा कारवाई करण्यापूर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावून सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. इनामदर हे मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. इनामदार व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, पो.नि. इनामदार, स.पो.आ. गोधें, दोन पंच व पडताळणी पथक असे पडताळणी करीता सरकारी वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, धर्मादाय आयुक्त भवन, डॉ. ॲनी बेझट रोड, वरळी, मुंबई च्या दिशेने गेलो व कार्यालयाजवळील स्वातंत्र्य सैनिक भवन जवळ थाबंलो. तेथे पो.नि. इनामदार यांनी पोलीस अमंलदारांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लावला. त्यांनतर मी, व पंच श्री. सचिन शिर्सेकर असे लोकसेवकास भेटण्यासाठी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धर्मादाय आयुक्त इमारत, वरळी, मुंबई येथे पायी जावुन लोकसेवक श्री. बोंबले यांची भेट घेऊन मी त्यांना " पेपर रेडी करके रखा क्या...." असे विचारले असता लोकसेवक श्री. बोंबले यांनी सांगितले की, ' ऐसे थोडी मिश्रा जी...ऐसे थोडी ना काम होता है यार....पैसा दे दो काम हो जायेगा तुरंत....' त्यामुळे मी त्यांना ' थोडा कम करके लेना, फायनल कितना बतावो....' अशी विचारणा केली त्यावेळी लोकसेवक बोंबले यांनी ' एक हजार रुपये मिले...चार हजार हि देना' असे सांगितल्याने मी पैशाची व्यवस्था करून येतो असे सांगून पंचासह निघून आलो.

त्यानंतर मी आणि पंच श्री सचीन शिर्सेकर असे शासकीय वाहनाजवळ आलो. सदरवेळी पो.नि. इनामदार यांनी पोलीस अमंलदार यांच्या मदतीने व्हाईस रेकॉर्डर बंद केला व झालेल्या हकिकतीबाबत विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक यांनी रू ४,०००/— इतक्या लाचेची मागणी केलेबाबत सांगितले. त्याबाबत व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन त्याबाबत त्यांची खात्री झाल्यानंतर लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि इनामदार यांनी नमुद पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची लगेच मागणी केलेबाबत निष्पन्न झाल्याने सापळा कारवाई तात्काळ करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पो.नि इनामदार यांनी मला सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. इनामदार यांनी मला लोकसेवक बोंबले यांना दयावयाचे रु. ४,०००/— ( अक्षरी रु. चार हजार ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना माइया बचतीतील भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या ०८ नोटा, एकुण रु. ४,०००/— (अक्षरी रु. चार हजार) त्यांचेकडे दिले. माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. माइया शर्टाचा डावा खिसा वगळून इतर खिश्यामध्ये मिळून आलेल्या वस्तु पो.नि. इनामदार याचेकडे ठेवल्या. तद्नंतर मी दिलेल्या नोटांचे पो.नि. इनामदार यांनी मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले. नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस चालकाने ॲंथ्रेसिन पावडर लावून मला त्याबाबत माहिती दिली. सदर रक्कम माझे शर्टच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात दोन पंचासमक्ष ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत पो.नि. इनामदार यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक बोंबले यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, धर्मादाय आयुक्त भवन, डॉ ॲनी बेझट मार्ग, वरळी मुंबई येथे लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने मी माझा हातरूमाल माइया तोंडावरून फिरवेन अशी कृती करण्याची सुचना केली. त्यानंतर पोलीस पथक धर्मादाय आयुक्त कार्यालयात कोणासही संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

समक्ष,

(इम्रान म. इनामदार),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

त्यानंतर पो.नि. इनामदार, यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोलीस अमंलदार यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील आतील बनियानला लावला. त्यानंतर मी व पंच श्री. सचिन शिर्सेकर असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. आम्ही लोकसेवक बोंबले यांची पहिल्या मजल्यावरील कॅश कांऊटरवर भेट घेतली त्यावेळी लोकसेवक बोंबले यांनी मला असे सांगितले की, जब तक पैसा नही मिलेगा तब तक कुछ होगा नही...' त्यामुळे मी लोकसेवक बोंबले यांना असे सांगितले की ' एक घंन्टे में कर के दो...' त्यावेळी लोकसेवक बोंबले यांनी मी आणलेली रूपये ४,०००/– रक्कम उजव्या हाताने स्विकारून ते माजून त्यांच्या टेबलाच्या उजव्या ड्राव्हरमध्ये ठेवले आणि मला १ तासामध्ये येणास सांगितले.

त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन सापळा पथकास दिसेल अशा पद्धतीने माझा हात रूमाल माइया तोडावरून फिरवून पुर्वनियोजीत इशारा केला असता सापळा पथकातील अंमलदार यांनी लोकसेवक बोंबले यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

लोकसेवक श्री.गणेश शिवाजी बोंबले, लेखापाल इन्स्पेक्टर, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धर्मादाय आयुक्त इमारत, डॉ. ॲनी बेझट मार्ग, वरळी, मुंबई यांनी मला माहिती अधिकारा अंतर्गत माहिती देण्यासाठी अप्रामाणिकपणे रु ४,०००/– ( अक्षरी रु. चार हजार फक्त) इतक्या लाचेची मागणी करून ती रक्कम गैरलाभ म्हणुन स्वत:करीता स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक श्री गणेश शिवाजी बोंबले यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली तसेच मला हिंदीत समजावून सांगितली असुन माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(इम्राम इनामदार),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

सही/दिनांक

25/01/23

95810

(१०)

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे : तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved : रुपये ४,०००/- लाचेची मागणी केलेली रक्कम

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ---
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी श्री. गणेश शिवाजी बोकसे यांनी फिर्यादी यांना माहितीच्या अधिकारांतर्गत तात्काळ माहिती देण्याकरीता शासकीय पारिश्रमाखेरीज रुपये ४,०००/- (अक्षरी- चार हजार) रकमेची मागणी करून स्वतःच्या फायद्याकरीता स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ............ Rank............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P.S ............, District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली, फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name : इमान म. इनामदार
पदनाम Rank : पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Posting
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**